ePaper
सतीश वाघ यांच्या हत्येप्रकरणी मोठा खुलासा, पत्नीनेच दिली हत्येची सुपारी



॥ वर्ष - 8 । अंक -167 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 26 डिसेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- परिस्थितीनुसार खेळणे आवश्यक!
- विनोद कांबळीला लाखांची मदत जाहीर!
- शेजाऱ्यांचे भांडण पोहचले दिल्लीत!
- सन्मान योजना नाकारणाऱ्यांवर कारवाई

### वाढत्या नागरीकरणामुळे महापालिकेवर वाढला ताण

# पुण्यात होणार दोन महापालिका?

## पुणे महापालिकेचे विभाजन करावेच लागेल, मंत्री चंद्रकांत पाटील यांचे मोठे विधान

**। पुणे । महाईन्यूज**

**महापालिकेत हद्दीलगतच्या गावांच्या समावेशानंतर राज्यातील सर्वांत मोठी महापालिका बनलेल्या पुणे महापालिकेवरील प्रशासकीय ताण दिवसेंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमीवर आता आणखी उशीर न करता पुणे महापालिकेचे विभाजन करावेच लागेल, अशी स्पष्ट भूमिका उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मंगळवारी मांडली.**



हडपसरचे आमदार चेतन तुपे यांनी पुण्यासह पिंपरी-चिंचवडचा विकास वेगाने होत असल्याने तेथेही वेगळी पालिकेची गरज अधोरेखित करून, पुण्याच्या पूर्व व पश्चिम बाजूस स्वतंत्र महापालिका कराव्यात, अशी मागणी केली. पुणे महापालिकेची सीमासंवर्धीत गावांचा समावेश झाल्यानंतर प्रशासनावरील ताण वाढल्यामुळे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुणे महापालिकेचे विभाजन करण्याची भूमिका मांडली आहे. हडपसरचे आमदार चेतन तुपे यांनीही पूर्व आणि पश्चिम पुणे महापालिका निर्माण करण्याची गरज अधोरेखित केली आहे. दोघांनीही लवकरच या गोष्टीसाठी कार्यवाही होण्याची आशा व्यक्त केली आहे.

पुणे श्रमिक पत्रकार संघातर्फे शहरातील नवनिर्वाचित आमदार व मंत्र्यांसोबत वार्तालापाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात बोलताना पाटील व तुपे यांनी ही भूमिका मांडली. पुणे महापालिकेच्या परिसरात प्रचंड वेगाने होणारे नागरीकरण पाहता व ३२ गावांच्या समावेशानंतर पालिका प्रशासनावरील वाढलेला ताण पाहता पुण्यासाठी आणखी एका महापालिकेची गरज आहे,पाटील व तुपे यांनीही या भूमिकेचे समर्थने केल्याने सरकार लवकरच याबाबत सकारात्मक पाऊल टाकेल, अशी आशा निर्माण झाली आहे.

“पीएमआरडीए’ ही काही महापालिका होऊ शकत नाही. त्यामुळे आता अधिक उशीर न करता नव्या महापालिकेचा प्रश्न मार्गी लावावा लागेल,’ असे पाटील म्हणाले. विभाजनाचा प्रश्न आला की नावावरून बरेच काही अडते. ‘पुणे’ या नावातच खूप काही दडले आहे. त्याला आर्थिक, सामाजिक, भौगोलिक कंगोरे आहेत. त्यामुळे यातून मार्ग काढावा लागेल. त्यासाठी एखाद्या ‘एजन्सी’ला काम देऊन त्याचे स्वरूप तयार करून घ्यावे लागेल,’ असे पाटील म्हणाले.

सुमारे तीन वर्षांपासून पुण्यासह अनेक शहरांमध्ये प्रशासकराज आहे. नगरसेवक नसल्याने नागरिकांची कामे अडत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात न्यायालयातील याचिकांचा निकाल जानेवारीत अपेक्षित आहे. त्यानंतर प्रभागरचना, हरकती सूचना यासाठी काही कालावधी द्यावा लागेल. मार्च, एप्रिलमध्ये परीक्षा असतील. मे महिन्याच्या आसपास आपल्याला स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रश्नांना न्याय देता येईल, अशा शब्दात चंद्रकांत पाटील यांनी महापालिका निवडणुकांच्या तारखांचे सूतोवाच केले.

### पूर्व, पश्चिम पुणे महापालिका

‘पुणे सुपरफास्ट वेगाने विस्तारत आहे. पुण्याची वाढ कोणी रोखू शकणार नाही. आत्ताच मोठ्या प्रमाणावर समस्या जाणवू लागल्या आहेत. २५ वर्षांनंतर काय परिस्थिती असेल, सांगता येत नाही. गुंठेवारी वाढत राहिली, तर नव्याने विकसित होणाऱ्या भागांत कोणत्याही आरक्षणांसाठी जागाच उरणार नाही. त्यामुळे लवकरात लवकर पुणे शहराच्या पूर्व व पश्चिम बाजूंना नव्या महापालिका करणे आवश्यक आहे. त्यासाठीचा निर्णय आत्ताच घ्यावा लागेल,’ असे चेतन तुपे यांनी स्पष्ट केले.

# टिळेकरांच्या मामाचा काटा मामीनेच काढला

## भाडेकरूसोबत मोहिनीची जवळीक खटकली अन् फटक्यात निकाल

**। पुणे । प्रतिनिधी : महाईन्यूज**

हडपसरमधील भाजप आमदार योगेश टिळेकर यांचे मामा असलेले हॉटेल व्यावसायिक सतीश वाघ यांचे अपहरण करुन खून करण्याची सुपारी त्यांच्या पत्नीनेच दिली, असे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी पुणे पोलिसांनी सतीश वाघ यांच्या पत्नी मोहिनी (वय ४८) हिला बुधवारी अटक केली. पतीच्या जाचाला कंटाळून






पाच लाख रुपयांची सुपारी दिल्याचे तिने कबूल केल्याचे पोलिसांनी सांगितले.भाजपचे आमदार योगेश टिळेकर यांचे मामा असलेल्या सतीश सादबा वाघ (वय ५९) यांचे नऊ डिसेंबरला अपहरण करून उरुळी कांचन येथील शिंदवणे घाटात खून करण्यात आला होता.

मोहिनी वाघ (वय ४८, रा. ब्लूबेरी हॉटेलजवळ, मांजरी फार्म) हिला पोलिसांनी अटक केली. तिने गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर बुधवारी सायंकाळी साडेपाच वाजता तिला अटक करण्यात आली. मोहिनी वाघला आज (गुरुवारी) लष्कर न्यायालयात हजर केले जाणार आहे.

### कोणाकोणाला अटक?

पवन श्यामसुंदर शर्मा (वय ३०, रा. आव्हाळवाडी, वाघोली), नवनाथ अर्जुन गुरसाळे (वय ३१, रा. डोमखेल रोड, वाघोली, मूळ रा. बीड), विकास ऊर्फ विक्की सीताराम शिंदे (वय २८, रा. आव्हाळवाडी रोड, वाघोली, मूळ रा. अहिल्यानगर), अक्षय ऊर्फ सोन्या हरीश जावळकर (वय २९, रा. फुरसुंगी फाटा) आणि अतीश संतोष जाधव (वय २०, लोणीकंद) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

भाजपचे आमदार योगेश टिळेकर यांचे मामा असलेल्या सतीश सादबा वाघ (वय ५९) यांचे नऊ डिसेंबरला अपहरण करून उरुळी कांचन येथील शिंदवणे घाटात खून करण्यात आला होता.


# खासदार बारणेंनी काळजी करू नये!

## आमदार अमित गोरखे यांचा खासदार बारणेंना खोचक टोला

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेना शिंदे गटाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील पोलिसांवर केलेल्या गंभीर आरोपानंतर भाजपचे आमदार अमित गोरखे यांनी श्रीरंग बारणे यांना प्रत्युत्तर दिल आहे. श्रीरंग बारणे यांनी काळजी करू नये, देवेंद्र फडणवीस हे सक्षमपणे गृहमंत्रिपद सांभाळत आहेत, असं म्हणत त्यांना खोचक टोला लगावला आहे. अमित गोरखे हे प्रसारमाध्यमांशी पिंपरी-चिंचवडमध्ये बोलत होते.**





शिवसेना शिंदे गटाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील पोलीस कर्मचारी हे सर्वसामान्य नागरिकांना दाद देत नसल्याचा आरोप करत थेट पोलीस आयुक्तांना पत्र दिलं होतं. पोलीस सर्वसामान्यांच्या तक्रारी घेत नाहीत असा आरोप त्यांनी केला. अप्रत्यक्षपणे श्रीरंग बारणे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या गृह खात्यावर आरोप केल्याने भाजपचे आमदार अमित गोरखे यांनी प्रत्युत्तर दिले आहे.श्रीरंग बारणे हे आमच्याच महायुतीत आहेत. आमच्यासोबत ते काम करत आहेत. मी त्यांच्याशी याबाबत बोलणार आहे. त्यांना कुठे आणि कसली अडचण आहे. हे जाणून घेणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे गृहमंत्रिपद सांभाळण्यास सक्षम आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली असे काही घडेल असे मला वाटत नाही. त्यामुळं श्रीरंग बारणे यांनी काळजी करू नये, असं गोरखे यांनी आवाहन करत खोचक टोला लगावला आहे.श्रीरंग बारणेंच्या आरोपांमुळे महायुतीत वादाची ठिणगी पडली आहे. महायुतीत आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. दरम्यान, एका प्रकरणात खासदार श्रीरंग बारणे यांचं म्हणणे पोलिसांनी ऐकून घेतलं नव्हतं. याच प्रकरणात बारणेंचा अहंकार दुखावल्याने पोलिसांवर गंभीर आरोप केल्याची पोलीस वर्तुळात चर्चा आहे. नेमकं ते प्रकरण कुठं आहे. याविषयी देखील चर्चा सुरू झाली आहे.शिवसेना शिंदे गटाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील पोलिसांवर केलेल्या गंभीर आरोपानंतर भाजपचे आमदार अमित गोरखे

### श्रीरंग बारणे हे आमच्याच महायुतीत

शिवसेना शिंदे गटाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील पोलीस कर्मचारी हे सर्वसामान्य नागरिकांना दाद देत नसल्याचा आरोप करत थेट पोलीस आयुक्तांना पत्र दिलं होतं. पोलीस सर्वसामान्यांच्या तक्रारी घेत नाहीत असा आरोप त्यांनी केला. अप्रत्यक्षपणे श्रीरंग बारणे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या गृह खात्यावर आरोप केल्याने भाजपचे आमदार अमित गोरखे यांनी प्रत्युत्तर दिले आहे.श्रीरंग बारणे हे आमच्याच महायुतीत आहेत. आमच्यासोबत ते काम करत आहेत. मी त्यांच्याशी याबाबत बोलणार आहे. त्यांना कुठे आणि कसली अडचण आहे. हे जाणून घेणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे गृहमंत्रिपद सांभाळण्यास सक्षम आहेत.

### बारणेंचा अहंकार दुखावल्याने आरोप

याविषयी देखील चर्चा सुरू झाली आहे.शिवसेना शिंदे गटाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील पोलिसांवर केलेल्या गंभीर आरोपानंतर भाजपचे आमदार अमित गोरखे यांनी श्रीरंग बारणे यांना प्रत्युत्तर दिल आहे. महायुतीत आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. दरम्यान, एका प्रकरणात खासदार श्रीरंग बारणे यांचं म्हणणे पोलिसांनी ऐकून घेतलं नव्हतं. याच प्रकरणात बारणेंचा अहंकार दुखावल्याने पोलिसांवर गंभीर आरोप केल्याची पोलीस वर्तुळात चर्चा आहे. नेमकं ते प्रकरण कुठं आहे. श्रीरंग बारणे यांनी काळजी करू नये, देवेंद्र फडणवीस हे सक्षमपणे गृहमंत्रिपद सांभाळत आहेत, असं म्हणत त्यांना खोचक टोला लगावला आहे.

---

# खंडाळा घाटात प्रचंड वाहतूक कोंडी

## घाटात दहा ते बारा किलोमीटर अंतरापर्यंत वाहनांच्या रांगा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ख्रिसमस अर्थात नाताळ या सणाचा व सुट्ट्यांचा आनंद घेण्यासाठी मुंबईकर पर्यटक मोठ्या संख्येने आज २५ डिसेंबर रोजी पहाटेपासूनच पर्यटन स्थळांच्या दिशेने मार्गस्थ झाल्याने मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर खंडाळा घाटात प्रचंड मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली आहे.**

मुंबईहून पुण्याच्या दिशेने येणाऱ्या मार्गावर साधारणतः दहा ते बारा किलोमीटर अंतरापर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. सदरची वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी खंडाळा बोगद्याच्या तोंडावर पुण्याहून मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक थांबवत मुंबईहून पुण्याकडे येणाऱ्या वाहनांसाठी सर्व सहा लेन खुल्या करत वाहतूक कोंडी कमी करण्याचा प्रयत्न महामार्ग पोलीस करत आहेत. मात्र वाहनांची संख्या प्रचंड असल्याने लांबच लांब वाहनांच्या रांगा गेल्या आहेत.

नाताळ सण तसेच नवीन वर्ष स्वागतासाठी मोठ्या प्रमाणात मुंबईकर पर्यटक हे लोणावळा, खंडाळा, कोल्हापूर, महाबळेश्वर, पांचगणी तसेच कोकण भागामध्ये निघाले आहेत. बहुतांश पर्यटक एक खाजगी वाहनांमधून प्रवास करत असल्याने मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर आणि मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर वाहनांची संख्या अचानक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पहाटेपासूनच या वाहनांमुळे मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर



खंडाळा घाटातील अमृतांजन पूल ते अंडा पॉईंट तसेच खालापूर टोल नाका या परिसरामध्ये वाहनांच्या दूरवर रांगा गेल्या आहेत. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी खंडाळा महामार्ग पोलीस व बोरघाट महामार्ग पोलीस हे सातत्याने प्रयत्नशील आहेत. बंद देखील पडत असल्याने त्यामुळे देखील कोंडीमध्ये भर पडत आहे. पर्यटकांनी या सुट्ट्यांच्या कालावधीमध्ये तसेच पुढील किमान आठ ते दहा दिवस पर्यटन स्थळे जाताना वेळेचे नियोजन करून घराबाहेर पडावे. जेणेकरून आपला वाहतूक कोंडी मध्ये अडकून राहून वेळ जाणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच नियमांचे पालन करावे, चुकीच्या पद्धतीने वाहने पुढे घेऊन जाऊन वाहतूक कोंडीत भर घालू नये असे आव्हान महामार्ग पोलिसांच्या वतीने करण्यात आले

### वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली

बहुतांश पर्यटक एक खाजगी वाहनांमधून प्रवास करत असल्याने मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर आणि मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर वाहनांची संख्या अचानक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पहाटेपासूनच या वाहनांमुळे मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर खंडाळा घाटातील अमृतांजन पूल ते अंडा पॉईंट तसेच खालापूर टोल नाका या परिसरामध्ये वाहनांच्या दूरवर रांगा गेल्या आहेत. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी खंडाळा महामार्ग पोलीस व बोरघाट महामार्ग पोलीस हे सातत्याने प्रयत्नशील आहेत. वाहतूक कोंडी मध्ये अनेक वाहने गरम होऊन बंद देखील पडत असल्याने त्यामुळे देखील कोंडीमध्ये भर पडत आहे.

आहे.मुंबईहून पुण्याच्या दिशेने येणाऱ्या मार्गावर साधारणतः दहा ते बारा किलोमीटर अंतरापर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. सदरची वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी खंडाळा बोगद्याच्या तोंडावर पुण्याहून मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक थांबवत मुंबईहून पुण्याकडे येणाऱ्या वाहनांसाठी सर्व सहा लेन खुल्या करत वाहतूक कोंडी कमी करण्याचा प्रयत्न महामार्ग पोलीस करत आहेत. मात्र वाहनांची संख्या प्रचंड असल्याने लांबच लांब वाहनांच्या रांगा गेल्या आहेत.नाताळ सण तसेच नवीन वर्ष स्वागतासाठी मोठ्या प्रमाणात मुंबईकर पर्यटक हे लोणावळा, खंडाळा, कोल्हापूर, महाबळेश्वर, पांचगणी तसेच कोकण भागामध्ये निघाले आहेत.

## अटल बिहारी वाजपेयी यांची 100 वी जयंती साजरी

# अटलजींच्या विचारांचे पालन होणे ही खरी आदरांजली!

### भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केल्या भावना

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतरत्न स्व. अटल बिहारी वाजपेयी यांच्या ओजस्वी विचारांनी आणि स्फूर्तिदायक व्यक्तिमत्त्वाने करोडो भारतीयांच्या मनात राष्ट्राभिमान चेतवला आहे. आजच्या दिवशी त्यांच्या विचारधारांचा वारसा जपत देशाच्या प्रगतीसाठी काम करण्याचा दृढनिश्चय करून अटलजींच्या विचारांचे पालन करीत कार्य करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. काव्यात्मक भावनेची आणि राजकीय दूरदृष्टीची साक्ष देणारे अटलजी सदैव आमच्या मनात जिवंत राहतील, अशी भावना भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केली.**



भारताचे माजी पंतप्रधान, भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, आमचे प्रेरणास्त्रोत, भारतरत्न श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी यांच्या आज १०० वी जयंतीनिमित्त पिंपरी भाजपा मध्यवर्ती कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यावेळी आदरांजली व्यक्त करतांना जगताप बोलत होते.

यावेळी आमदार महेशदादा लांडगे, विधानपरिषद आमदार अमित गोरखे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य सदाशिव खाडे, महेश कुलकर्णी, मोरेश्वर शेडगे, माजी महापौर राहुल जाधव, कार्यकारी अध्यक्ष शत्रुघ्न काटे, जिल्हा सरचिटणीस नामदेव ढाके, वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, जिल्हा उपाध्यक्ष रवी देशपांडे, पुणे जिल्हा नियोजन समिती सदस्य काळूराम नढे, मंडल अध्यक्ष निलेश अष्टेकर, सहसंयोजक कायदा आघाडी दत्ता झुळूक, ओबीसी मोर्चाचे कैलास सानप, बेटी बचाव बेटी पढाओ अध्यक्ष प्रीती कामतीकर, भटके विमुक्त आघाडी अध्यक्ष गणेश ढाकणे, माजी सैनिक प्रकोष्ठ संयोजक देविदास साबळे, मंगेश धाडगे, गणेश ढोरे, दीपक नागरगोजे, देवदत्त लांडे, दीपक भंडारी, सीमा चव्हाण, जयश्री मकवाना आदी उपस्थित होते.



### भारतात सुशासन दिन साजरा

शंकर जगताप पुढे म्हणाले की, अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी 25 डिसेंबर रोजी भारतात सुशासन दिन साजरा केला जातो. 2015 मध्ये अटल बिहारी वाजपेयी यांना भारतरत्न प्रदान करण्यात आला होता. यानंतर मोदी सरकारने वाजपेयींची जयंती सुशासन दिन म्हणून साजरी करण्याची घोषणा केली. हा दिवस साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश नागरिकांना, विशेषतः विद्यार्थ्यांना सरकारच्या पारदर्शकतेची आणि जबाबदारीची जाणीव करून देणे असून त्याचे उद्दिष्ट चांगले प्रशासकीय कामकाज आणि नागरिकांच्या सहभागाला प्रोत्साहन देणे हा आहे, असेही त्यांनी सांगितले.

---

## नववर्षाच्या स्वागतास पर्यटननगरी सज्ज

### लोणावळ्यात हॉटेल्स बुकिंग जोरात, लोणावळा शहर परिसरात पर्यटकांची गर्दी होण्याची शक्यता

। लोणावळा ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**नाताळच्या सुट्ट्या आणि 'थर्टी फर्स्ट' पार्श्वभूमीवर लोणावळा शहर परिसरात पर्यटकांची गर्दी होण्याची शक्यता आहे. लोणावळा-खंडाळ्यातील हॉटेल्स, रिसॉर्टसच्या बुकिंगला पर्यटकांचा जोरदार प्रतिसाद लाभत आहे. अनेक सेकंडहोम हाउसफुल झाले असून नाताळलाच हॉटेल्सचे बुकिंग सरासरी साठ ते सत्तर टक्क्यांपर्यंत झाले आहे. त्यामुळे थर्टी फर्स्टला हॉटेल्स, रिसॉर्टस फुल होतील अशी आशा आहे.**



> खासगी बंगले, रिसॉर्टस, हॉटेल्स व्यावसायिकांनी नियमानुसार आवश्यक परवानग्या घेऊन व्यवसाय करावेत. नाताळ, नववर्षाचे स्वागत करताना नियमांचे उल्लंघन करू नये; अन्यथा कारवाई केली जाईल. शहर, ग्रामीण हद्दीतील हॉटेल चालक - मालक, टेंट व्यावसायिक, खासगी बंगलेधारकांनी गैरप्रकार होणार नाहीत. त्याची पुरेशी दक्षता घ्यावी.
>
> -सुहास जगताप, पोलिस निरीक्षक, लोणावळा शहर

सरत्या वर्षातील कटू आठवणी विसरत त्याला निरोप देण्यासाठी तसेच नव्या वर्षाचे हर्षोल्हासात स्वागत करण्यासाठी पर्यटननगरी लोणावळा सज्ज होत आहे. लोणावळ्याचे अर्थकारण प्रामुख्याने पर्यटनावर अवलंबून आहे. नूतन वर्षानिमित्त मौजमजा करण्यासाठी तसेच येथील प्रसिद्ध चिक्कीचा आस्वाद घेण्यासाठी लोणावळ्यात पुणे, मुंबईसह परराज्यांतून मोठ्या संख्येने पर्यटक येत असतात.

या काळात त्यांचे सेकंड होमबरोबरच बहुतांशी हॉटेल्स तसेच खासगी बंगल्यांमध्ये त्यांचे वास्तव्य असते. पवन मावळ, राजमाची, लोहगड, विसापूर, तुंग, कार्ला परिसर, कोराई गडासह लोणावळ्यातील विशेषतः लायन्स पॉइंट, खंडाळा येथील सनसेट पॉइंट, बोटिंग येथे हौशी गिरीप्रेमींसह पर्यटकांची पसंती आहे. पर्यटकांचे हॉटेल्स व रिसॉर्टपेक्षा खासगी बंगल्यांनाच अधिक प्राधान्य मिळत असल्याचे चित्र आहे.

#### एमटीडीसीकडून विशेष कार्यक्रम

वीकेंडला पर्यटकांची चांगली पसंती मिळाली. नववर्षाच्या पार्श्वभूमीवर कार्ला येथील एमटीडीसीचे बुकिंग फुल्ल झाले आहे. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असल्याचे माहिती कार्ला एमटीडीसीचे व्यवस्थापक विनायक काळे यांनी दिली.

#### पर्यटकांनी खबरदारी घ्यावी

पर्यटक पाण्यात बुडून मृत्युमुखी पडण्याच्या तसेच वाहनांच्या अपघाताच्या घटना वाढत आहे. गेल्या महिन्यात नौकाविहार करताना दोघा तरुणांचा पवना धरणात बुडाल्याने मृत्यू झाला. कुंडमळा, कासारसाई, भुशी धरण येथेही दुर्दैवी घटना घडल्या आहेत. सुट्ट्यांची मजा लुटताना उत्साहाला आवर घालत खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**कुणी कितीही, काहीही म्हटले, तरी नियती नावाची अदृश्य शक्ती अस्तित्वात आहे, हे मान्य करावेच लागेल ! सगळेच मान्य करतात, फक्त या ना त्या स्वरूपात व्यक्त होतात.. कोणी याला 'पेरलं ते उगवलं' असं म्हणतात, तर कोणी 'भोगा केलेल्या कर्माची फळं' असं म्हणून वेळ मारून नेतात. देशाच्या आणि महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही महिन्यात प्रचंड उलथापालथ झाली आणि त्या समुद्रमंथनातून जे काही बाहेर पडलं, ते वेगवेगळ्या दृष्टिकोनातून सगळ्यांनाच आवक करणारं होतं. जे काही घडलं, त्यामुळं खऱ्या अर्थानं आत्ता नियती नावाच्या त्या अदृश्य शक्तीची आठवण झाली !**

# नियती बडवते, अद्दल घडवते !



नुकत्याच झालेल्या महाराष्ट्राच्या निवडणुका लक्षात घ्या. महाराष्ट्रात मतपेटीतून जो जनादेश आला, तो पाहून अनेक राजकीय दिग्गजांची मती नक्कीच गुंग झाली असणार. अनेकांचे सारे अंदाज मोडीत निघाले, काहींचे अंदाज सपशेल चुकीचे ठरले. काही राजकीय फलंदाज भोपळाही फोडू शकले नाहीत. काही जण अस्तंगत होण्याच्या उंबरठ्यावर कसे बसे धापा टाकत बचावले. काहींची दांडी उडाली, काही रन आउट झाले, तर अनेकांनी हाराकिरी पत्करून त्याचे खापर ईव्हीएम वर फोडले. अनेकांचा जीव कसाबसा वाचला, पण बोटं तुटली.. त्रयस्थासाठी खरोखर ही सगळी गंमत जंमत झाली. एक गोष्ट लक्षात आली का? नियती बडवते, काहींना सडवते, महत्त्वाचं दडवते, कुणाकुणाला लढवते, तर काहींना अद्दल घडवते ! महाराष्ट्रात जे घडलं, ते सारं इतकं अकल्पित, धक्कादायक, उलथापालथ करणारं होतं, की बुद्धी कितीही ताणली तरी नेमका निष्कर्ष हाती येत नाही, काही समीकरण मांडता येत नाही. हे का घडलं ? कसं घडलं ? नेमकं कोणी घडवलं ?

## चला उत्तरे शोधू या..

पण शेवटी कसं आहे, उत्तरं तर शोधलीच पाहिजेत ना! या प्रश्नांची उत्तरं शेवटच्या प्रश्नापासून पाहू या. हे नियतीने घडवले, असे ठामपणे म्हणता येईल. नियती नेहमीच अगदी सामान्य वाटेल, अशा माणसांना हाताशी धरून असे चमत्कार घडवत असते, हे माझं मत झालं आहे. जेव्हा लक्षावधी लोक नियतीच्या इच्छेने एकच विचार, एकाच तीव्रतेने पुनः पुन्हा करायला लागतात, त्यावेळी या ईश्वरी चेतनेने सारे वायूमंडल ती कंपने ग्रहण करते. पुढे ती प्रत्येकाच्या मनात संक्रमित होतात, असा बोध घ्यायला हरकत नाही. हे सारे डोळ्यांना दिसत नाही. कानाने ऐकू येत नाही. बुद्धीच्या कक्षेत येत नाही. स्पर्शाने अनुभवता येत नाही. त्याचे गंधज्ञान होत नाही. ते परिवर्तन थेट हृदयातून कृतीत उतरते. ज्याच्या कृतीतून उतरले, तो फक्त माध्यम असतो, हे सर्वांत प्रथम लक्षात घ्या, म्हणजे नियती नावाचे कोडे काय आहे, याचा उलगडा होईल, आणि महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे सापडणे सोयीचे जाईल. यालाच त्सुनामी म्हणतात.

## अंदमानचे बोलके उदाहरण

अंदमानच्या बाराटांग या बेटावर एक आदिम, आदिवासी जमात आहे. त्यांना जारवा म्हणतात. त्यांची एकूण संख्या पाचशे - सहाशे असावी. जेव्हा त्या भागात त्सुनामी आली. समुद्र खवळला.. उंचच्या उंच लाटा उसळल्या, चक्क सत्तर, ऐंशी फूट उंचीच्या लाटा उसळल्या, तेव्हा झालेल्या भयंकर जलप्रलयाने शेकडो पर्यटक समुद्राच्या पोटात गडप झाले. पण, एकही जारवा त्यात नाहीसा झाला नाही, बेपत्ता झाला नाही ! कारण त्यांना निसर्गाच्या वर्तनातील अनैतिक घडामोडींची लक्षणे त्सुनामी येण्यापूर्वी काही तास अगोदरच त्यांच्या उपजत प्रेरणांद्वारे समजली. ते जारवा सरळ उंच डोंगरावर जाऊन काय घडते, याचे निरीक्षण करीत शांत बसले. त्सुनामी आली, प्रचंड नुकसान आणि होत्याचं नव्हतं करून शांत झाली. मगच ते सारे जारवा त्यांच्या सामान्य जीवनक्रमाकडे पुन्हा वळले. हे सांगायचं कारण, की कोणत्याही उच्च शिक्षित मनुष्याला याचा अंदाजच आला नाही.

## आठवतं का गोध्रा रेल्वे स्टेशनवर साबरमती

एक्स्प्रेसमध्ये कारसेवकांना निर्घृणपणे जाळून मारण्याची दुर्बुद्धी काही समाजकंटकांना झाली. त्याचे परिणाम संपूर्ण भारतात आजही उमटत आहेत. सर्वत्र वणवा पेटला. देशातील सत्तेचा सारीपाट कायमचा बदलण्याची ती नांदी होती. त्यावेळी सर्व देशाने नरेंद्र मोदी यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले, आज तेच नरेंद्र मोदी संपूर्ण देशावर, किंबहुना संपूर्ण जगावर सत्ता गाजवत आहेत.. गेली दहा वर्षे ! हमासच्या दहशतवाद्यांनी इस्राएलमध्ये शिरून बाराशे निष्पापांच्या निर्घृण हत्या केल्या, तेव्हा रस्त्यावर येऊन जल्लोष करणारे, मध्यरात्री फटाक्यांची आतषबाजी करणारे जे होते, त्यापैकी किमान चाळीस हजार लोकांना नंतरच्या इस्राएलने केलेल्या हल्ल्यात या जगाचा निरोप घ्यावा लागला, हा इतिहास अगदी ताजा आहे, विचार करण्यासारखा आहे. किमान दोन,तीन लाख लोकांना घरे भस्मसात झाल्याने तंबूत आश्रय घ्यावा लागला..ते रोज मरत मरत जगत आहेत. त्यापेक्षा ते गेले वर्षभर काळरात्र अनुभवत आहेत, यालाच नियती म्हणत असावेत !

## प्रभू श्रीरामाचे उदाहरण..

प्रभू श्रीरामांचे अस्तित्व नाकारणाऱ्यांचे उदाहरण बघा. नियतीने त्यांना तर राजकीयदृष्ट्या 'राम नाम सत्य है !' म्हणायला लावले. माझ्या एका मित्राने एका रिक्षावाल्याला मतदान निश्चित कर, असं सांगितलं. त्यावर तो रिक्षावाला त्याला म्हणाला, मी रामरायासाठी मत देणार आहे. आपल्याला आता रामराज्य आणायचे आहे. मी माझ्या रिक्षातून जमेल तेवढ्या वयस्क लोकांना मतदानाला नेईन. माझ्या हातून थोडं तरी धर्माचं काम झालं पाहिजे. अशा उत्कटतेने जेव्हा एकेक मनुष्य कोणी सांगितले म्हणून, किंवा न सांगता ही स्वयंप्रेरणेने हे धर्मकार्य करतो, तेव्हा जे घडते, त्याचे परिणाम भूकंपासारखे घडून गेल्यावर जाणवतात. मग नंतर हिशोब मांडला जातो. कोणी कोणी काय काय गमावले? कुठे कुठे पडझड झाली ? त्याखाली किती जण गाडले गेले ? किती जण मुळापासून उखडले गेले, किती जण आयुष्यातून उठले ! जे कसेबसे बचावले, त्यांनी मात्र शांतपणे याचा विचार करावा, एवढीच अपेक्षा ! जे उसळलेल्या लाटांवर स्वार झाले, त्यांनीही याचे भान ठेवावे, की ज्या लाटांवर आपण स्वार झालो आहोत, त्या आपला तोल गेला, तर आपल्याला अशाच एका गाफील क्षणी कायमचं पोटात घेतील. हे सगळे जे घडत असते त्यालाच नियती म्हणतात !थोडक्यात काय, तर नियती प्रचंड बलवान आहे. ती कितीही विरोध झाला, कट कारस्थाने झाली, तरी नरेंद्रजी मोदींना पदावर ठेवते. कितीही अंतर्गत विरोध असला, तरी इस्राएलच्या नेतान्याहूंच्या हातून युद्ध नेतृत्व करवते. अमेरिकेत ट्रम्पविरोधी कितीही मोहिमा राबवल्या, तरी ट्रम्प अमेरिकेत सत्तारूढ होणार असा निर्णय लागतो, ही सर्व उदाहरणे म्हणजे नियतीची ताकद आहे, ती स्पष्ट दिसत आहेत. भारताच्या सर्वनाशाची कामना गेली ७७ वर्षे रोज करणा-या पाकिस्तानला दिवाळखोरीच्या आणि चार तुकडे होण्याच्या अवस्थेत जावे लागते, यापेक्षा वेगळे उदाहरण काय असू शकते? एका खुशाल चेंडू मनुष्याच्या हाती नेतृत्व दिल्याने युक्रेन होरपळून निघतो. अनेकांना होऊ नये ती दुर्बुद्धी होते, आणि मग नियतीच्या कराल दाढा त्यांचा घास घेतात. ही तर सुरुवात आहे. आपण अजून बरंच काही पाहणार आहोत, अनुभवणार आहोत, त्या सर्वांची किंमत मोजणार आहोत. सगळं शांत झाल्यावर विश्लेषणही करणार आहोत, स्वतःलाच पुन्हा पुन्हा विचारणार आहोत, की हे सारे घडेल, हे आपल्याला समजले कसे नाही ? महाराष्ट्राच्या राजकारणात जे काही घडले आणि देवेंद्र फडणवीस सारखे व्यक्तिमत्व मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले, याचे बीज पाच वर्षांपूर्वी पेरले गेले आहे. ज्या दिवशी उद्धव ठाकरे यांनी युती तोडून दोन्ही काँग्रेसच्या मांडीवर बसण्याचा निर्णय घेतला, त्याच दिवशी नियतीने ठरवून टाकले असावे की पुढचे मुख्यमंत्री हे फडणवीसच असतील. पुन्हा मुद्दा येतो 'पेरले तेच उगवले !'.. नियतीने 'महायुती' च्या हातात पुन्हा सत्ता दिली, ती देखील प्रचंड बहुमताने..पाच वर्षांसाठी स्थिर सरकार मिळाले. सत्ताधारी फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार यांना देखील माहित आहे, की व्यवस्थित वागलो नाही, तर हीच नियती पुढील वेळी फटके देणार आहे.. नको नको एवढे झटके देणार आहे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# "अकेला देवेंद्र" क्या करेगा?

## सुप्रिया सुळेंच्या टीकेवर तीन वर्षांनी फडणवीसांचा पलटवार

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने दमदार विजय मिळवला. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने १३० हून अधिक जागा मिळवल्या आणि देवेंद्र फडणवीस पाच वर्षांनंतर पुन्हा एकदा राज्याचे मुख्यमंत्री झाले. आज मुख्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल नागपूरात फडणवीस यांचा सत्कार करण्यात आला. सुप्रिया सुळे यांनी तीन वर्षापूर्वी "अकेला देवेंद्र क्या करेगा?" म्हणत केलेल्या टीकेला यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे.**





या सत्कार समारंभात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "आपण सगळे कामाला लागलो आणि हा महाविजय मिळाला. आज सत्कार जरी मंचावरील लोकांचा होत असला तरी तो तुमच्या सर्वांच्या वतीने स्वीकारत आहोत. भाजपाच्या असंख्य कार्यकर्त्यांच्या वतीने आम्ही स्वीकारतोय. कारण कार्यकर्त्यांचे प्रतिक म्हणून आम्ही या ठिकाणी बसलो आहोत. एकदा सुप्रिया ताई असे म्हणाल्या होत्या की, अकेला देवेंद्र क्या करेगा? सुप्रिया ताईंचे म्हणणे खरे होते. अकेले देवेंद्र की कोई औकात नही है, अकेला देवेंद्र कुछ नही कर सकता. पण त्यांना त्यावेळी माहित नव्हते देवेंद्र एकटा नाही त्याच्याबरोबर संपूर्ण भारतीय जनता पार्टी आहे."तीन वर्षापूर्वी एका कार्यक्रमात बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली होती. त्यावेळी त्या म्हणाल्या होत्या की, "अकेला देवेंद्र क्या करेगा?" आज तीन वर्षानी देवेंद्र फडणवीस यांनी सुप्रिया सुळे यांच्या या टीकेला उत्तर दिले आहे.२०१९ मध्ये राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपा-शिवसेना युतीला बहुमत मिळाले होते. पण, मुख्यमंत्री पदावरून वाद झाल्याने शिवसेना बाहेर पडली आणि काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेचे महाविकास आघाडी निर्माण झाली. त्यानंतर सुमारे दोन वर्षांत एकनाथ शिंदे आणि ४० आमदारांनी बंड केले आणि भाजपा पुन्हा सत्तेत आली. दरम्यान त्यावेळी फडणवीस यांना मुख्यमंत्री पदाने हुलकावणी दिली होती. पुढे, अजित पवारही सुमारे ४० आमदारांबरोबर महायुती सरकारमध्ये सहभागी झाले होते. आता झालेल्या विधानसभा निवडणुकीत एकट्या भाजपाने १३२ जागा आणि महायुतीने २३७ जागा मिळवत सत्ता कायम राखली.

यावेळी सर्वाधिक जागा असल्याने भाजपाच्या देवेंद्र फडणवीस यांच्या गळ्यात मुख्यमंत्री पदाची माळ पडली.राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने दमदार विजय मिळवला. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने १३० हून अधिक जागा मिळवल्या आणि देवेंद्र फडणवीस पाच वर्षांनंतर पुन्हा एकदा राज्याचे मुख्यमंत्री झाले. आज मुख्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल नागपूरात फडणवीस यांचा सत्कार करण्यात आला. सुप्रिया सुळे यांनी तीन वर्षापूर्वी "अकेला देवेंद्र क्या करेगा?" म्हणत केलेल्या टीकेला यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे. या सत्कार समारंभात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "आपण सगळे कामाला लागलो आणि हा महाविजय मिळाला. आज सत्कार जरी मंचावरील लोकांचा होत असला तरी तो तुमच्या सर्वांच्या वतीने स्वीकारत आहोत. भाजपाच्या असंख्य कार्यकर्त्यांच्या वतीने आम्ही स्वीकारतोय. कारण कार्यकर्त्यांचे प्रतिक म्हणून आम्ही या ठिकाणी बसलो आहोत. एकदा सुप्रिया ताई असे म्हणाल्या होत्या की, अकेले देवेंद्र क्या करेगा? सुप्रिया ताईचे म्हणणे खरे होते. अकेले देवेंद्र की कोई औकात नही है, अकेला देवेंद्र कुछ नही कर सकता. पण त्यांना त्यावेळी माहित नव्हते देवेंद्र एकटा नाही त्याच्याबरोबर संपूर्ण भारतीय जनता पार्टी आहे."२०१९ मध्ये राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपा-शिवसेना युतीला बहुमत मिळाले होते. पण, मुख्यमंत्री पदावरून वाद झाल्याने शिवसेना बाहेर पडली आणि काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेचे महाविकास आघाडी निर्माण झाली.

### पुन्हा एकदा राज्याचे मुख्यमंत्री झाले

एकनाथ शिंदे आणि ४० आमदारांनी बंड केले आणि भाजपा पुन्हा सत्तेत आली. दरम्यान त्यावेळी फडणवीस यांना मुख्यमंत्री पदाने हुलकावणी दिली होती. पुढे, अजित पवारही सुमारे ४० आमदारांबरोबर महायुती सरकारमध्ये सहभागी झाले होते. आता झालेल्या विधानसभा निवडणुकीत एकट्या भाजपाने १३२ जागा आणि महायुतीने २३७ जागा मिळवत सत्ता कायम राखली. यावेळी सर्वाधिक जागा असल्याने भाजपाच्या देवेंद्र फडणवीस यांच्या गळ्यात मुख्यमंत्री पदाची माळ पडली.राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने दमदार विजय मिळवला. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने १३० हून अधिक जागा मिळवल्या आणि देवेंद्र फडणवीस पाच वर्षांनंतर पुन्हा एकदा राज्याचे मुख्यमंत्री झाले.

# आता खरी मजा, हिशेब चुकता करण्याची

## जरांगेंचा सरकारला इशारा, तर फडणवीसांनीही दिलं प्रत्युत्तर

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात गेल्या काही महिन्यांपासून मराठा आरक्षणाचा मुद्दा चर्चेत आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी अनेकवेळा उपोषण आणि आंदोलन केलं. त्यांच्या उपोषणावर राज्य सरकारने आरक्षणाबाबत योग्य तो निर्णय घेण्यासंदर्भात आश्वासन दिलं. मात्र, मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याच्या मागणीबाबत सरकारने अद्यापही कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही.**

आता राज्यात पुन्हा एकदा महायुतीचं सरकार आलं असून देवेंद्र फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री झाले आहेत. दरम्यान, मनोज जरांगे यांनी आता पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या प्रश्नांवरून राज्य सरकारला मोठा इशारा दिला आहे. तसेच येत्या २५ जानेवारीपासून आपण पुन्हा एकदा उपोषणाला सुरुवात करणार असल्याचं मनोज जरांगे यांनी जाहीर केलं आहे. दरम्यान, मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर बोलताना मनोज जरांगे यांनी पुन्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर नाव न घेता टीका केली. मनोज जरांगे पाटील हे परभणी दौऱ्यावर होते. यावेळी





संवाद साधताना मनोज जरांगे यांनी म्हटलं की, "आता खरी मजा आहे, हिशेब चुकता करण्याची. आधी ते दुसऱ्यांवर ढकलत होते. पण आता कळेल की आरक्षण देतात की नाही", असं म्हणत मनोज जरांगे यांनी नाव न घेता देवेंद्र फडणवीस यांच्यावर खोचक टीका केली."मराठा समाजाच्या आरक्षणाचा विषय संपल्यानंतर मी शेतकऱ्यांचा विषय हातात घेणार आहे. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला दर कसे देत नाहीत आणि धनगर आरक्षण आणि मुस्लिम आरक्षणाचाही प्रश्न कसा मार्गी लागत नाही? तेही मी पाहतो. शेतकऱ्यांचा प्रश्नही मार्गी लागला पाहिजे. मराठा समाजाच्या एकजुटीमुळे दोन कोटी पेक्षा जास्त मराठा समाज आतापर्यंत आरक्षणामध्ये गेला. आता येत्या २५ जानेवारी रोजी मी पुन्हा एकदा आमरण उपोषण करणार आहे. उपोषण मला किती सहन होईल हे मला माहिती नाही.

### मी तर आरक्षण द्या म्हणतो

पण मी माझ्या समाजासाठी मरायलाही तयार आहे", असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे."आता काहीजण म्हणत आहेत की, तेच (महायुतीचं) सरकार पुन्हा सत्तेत आलं आहे. मग आरक्षण देतील का? पण आता खरी मजा आहे, हिशेब चुकता करण्याची. आता होऊ द्या, कारण आधी ते दुसऱ्यांवर ढकलत होते. मी मराठा आरक्षणाला विरोध करत नाही, मी तर आरक्षण द्या म्हणतो, असं म्हणायचे. मग आता समजेल की ते (देवेंद्र फडणवीस) मराठा आरक्षण देतात की नाही", असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे. यावेळी त्यांनी कोणाचंही थेट नाव घेतलं नाही.

# शेजाऱ्यांचे भांडण पोहचले दिल्लीत !

## उत्तर प्रदेशच्या तरूणाने संसद भवनासमोर घेतले पेटवून

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीत आज नव्या संसद भवनाजवळ एक धक्कादायक घटना समोर आली आहे. आज दुपारी एका व्यक्तीने स्वतःला पेटवून घेतले. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान तेथे घटना घडली त्यावेळी उपस्थित असलेल्या नागरिकांसह रेल्वे पोलिसांनी तातडीने आग विझवली. त्यानंतर संसद भवनाच्या सुरक्षा रक्षकांनी जखमी व्यक्तीला राम मनोहर लोहिया रुग्णालयात दाखल केले आहे. यावेळी पोलिसांना घटनास्थळावर अर्धवट जळालेली दोन पानांचे पत्र सापडले आहे.**



समोर आलेल्या माहितीनुसार पीडिताचे नाव जितेंद्र असे असून, तो उत्तर प्रदेशातील बागपतचा आहे. या पीडित व्यक्तीने रेल्वे भवनाजवळील एका उद्यानात स्वत:ला पेटवून घेतले आणि नंतर संसद भवनाच्या दिशेने तो धावू लागला, असे पोलिसांनी सांगितले. दरम्यान रेल्वे भवन नव्या संसद भवनाच्या इमारतीसमोर आहे. या प्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, “घटनेतील पीडित व्यक्तीचे बागपतमधील एका कुटुंबाशी वाद आहे. या वादामुळे दोन्ही कुटुंबांनी तुरुंगवास भोगला आहे. या घटनेमुळे पीडित जितेंद्र व्यथित होता. त्यामुळे जितेंद्र आज रेल्वेने दिल्लीला आला. त्यानंतर जितेंद्रने रेल्वे भवन परिसरातील उद्यानात अंगावर पेट्रोल ओतून स्वत:ला पेटवून घेतले.”“या पीडिताला रुग्णालयात दाखल करेपर्यंत तो गंभीरपणे भाजला होता. त्याच्यावर आता बर्न्स युनिटमध्ये उपचार सुरू आहेत,” असे पोलिसांनी पुढे सांगितले. आज दुपारी ३.३५ च्या सुमारास अग्निशमन दलाला या घटनेबाबत फोनवरून माहिती मिळाली. त्यानंतर अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी रवाना झाले. दरम्यान पोलीस आणि फॉरेन्सिक तपास पथकाने घटनास्थळी पुरावे गोळा केले. घटनेनंतर लगेचच घटनास्थळावरील व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. यामध्ये पीडित व्यक्तीला काळ्या ब्लँकेटने झाकलेले दिसत आहे. या घटनेविषयी दिल्लीचे विशेष पोलीस आयुक्त मधुप तिवारी यांनी सांगितले की, “रेल्वे भवन चौकासमोर एका व्यक्तीने स्वतःला पेटवून घेतल्याची घटना दुपारी साडेतीन वाजता घडली. त्यानंतर तो धावत सुटला. हे पाहिल्यानंतर घटनास्थळी असलेल्या पोलीस आणि नागरिकांनी आग विझवण्यात मदत केली आणि त्याला राम मनोहर लोहिया रुग्णालयात दाखल केले. जितेंद्र कुमार असे या घटनेतील पीडिताचे नाव आहे. तो बागपतचा आहे. तेथे शेजाऱ्यांशी भांडल्याप्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल आहे. त्याच्यावर यापूर्वी तीन गुन्हे दाखल आहेत. त्याचे म्हणणे आहे की, बागपत पोलीस या प्रकरणांचा योग्य तपास करत नसल्याने त्याला न्याय मिळेना.”दिल्लीत आज नव्या संसद भवनाजवळ एक धक्कादायक घटना समोर आली आहे. आज दुपारी एका व्यक्तीने स्वतःला पेटवून घेतले. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान तेथे घटना घडली त्यावेळी उपस्थित असलेल्या नागरिकांसह रेल्वे पोलिसांनी तातडीने आग विझवली. त्यानंतर संसद भवनाच्या सुरक्षा रक्षकांनी जखमी व्यक्तीला राम मनोहर लोहिया रुग्णालयात दाखल केले आहे. यावेळी पोलिसांना घटनास्थळावर अर्धवट जळालेली दोन पानांचे पत्र सापडले आहे.. या घटनेमुळे पीडित जितेंद्र व्यथित होता. त्यामुळे जितेंद्र आज रेल्वेने दिल्लीला आला. त्यानंतर जितेंद्रने रेल्वे भवन परिसरातील उद्यानात अंगावर पेट्रोल ओतून स्वत:ला पेटवून घेतले.”“या पीडिताला रुग्णालयात दाखल करेपर्यंत तो गंभीरपणे भाजला होता. त्याच्यावर आता बर्न्स युनिटमध्ये उपचार सुरू आहेत,” असे पोलिसांनी पुढे सांगितले.आज दुपारी ३.३५ च्या सुमारास अग्निशमन दलाला या घटनेबाबत फोनवरून माहिती मिळाली. त्यानंतर अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी रवाना झाले. दरम्यान पोलीस आणि फॉरेन्सिक तपास पथकाने घटनास्थळी पुरावे गोळा केले.

### स्वत:ला पेटवून का घेतले

घटनेनंतर लगेचच घटनास्थळावरील व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. यामध्ये पीडित व्यक्तीला काळ्या ब्लँकेटने झाकलेले दिसत आहे.या घटनेविषयी दिल्लीचे विशेष पोलीस आयुक्त मधुप तिवारी यांनी सांगितले की, “रेल्वे भवन चौकासमोर एका व्यक्तीने स्वतःला पेटवून घेतल्याची घटना दुपारी साडेतीन वाजता घडली. त्यानंतर तो धावत सुटला. हे पाहिल्यानंतर घटनास्थळी असलेल्या पोलीस आणि नागरिकांनी आग विझवण्यात मदत केली आणि त्याला राम मनोहर लोहिया रुग्णालयात दाखल केले. जितेंद्र कुमार असे या घटनेतील पीडिताचे नाव आहे. तो बागपतचा आहे. तेथे शेजाऱ्यांशी भांडल्याप्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल आहे. त्याच्यावर यापूर्वी तीन गुन्हे दाखल आहेत. दिल्लीत आज नव्या संसद भवनाजवळ एक धक्कादायक घटना समोर आली आहे. आज दुपारी एका व्यक्तीने स्वतःला पेटवून घेतले. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

# महिला सन्मान योजना नाकारणाऱ्यांवर कारवाई

## दिल्लीच्या मुख्यमंत्री अतिशींनी दिला मोठा इशारा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्ली विधानसभेची निवडणूक तोंडावर आलेली आहे. पुढील काही महिन्यांत निवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. मात्र, निवडणुकीच्या आधीच दिल्लीत मोठ्या राजकीय घडामोडी पाहायला मिळत आहेत. आगामी निवडणुकीच्या तोंडावर आप सरकारकडून दिल्लीकरांसाठी मोठमोठ्या योजनांची घोषणा करण्यात येत आहे.**



मात्र, दिल्लीतील आप सरकारने जाहीर केलेल्या ‘मुख्यमंत्री महिला सन्मान योजना’ आणि संजीवनी योजनेवरून राजकारण तापलं आहे. मुख्यमंत्री महिला सन्मान योजनेच्या लाभासाठी महिलांची नोंदणी देखील केली जात आहे. मात्र, असं असतानाच दिल्ली सरकारच्याच महिला व बालकल्याण विभागाने अशी कोणतीही योजना राबवली जात नसल्याचं म्हटलं आहे. त्यामुळे दिल्ली सरकारचाच मोठा गोंधळ उडाला आहे.दिल्लीच्या मुख्यमंत्री अतिशी आणि आम आदमी पक्षाचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी काही दिवसांपूर्वी ‘मुख्यमंत्री महिला सन्मान योजने’ची घोषणा केली. तसेच या योजनेनुसार लाभार्थी महिलांना दरमहा १००० रुपये दिले जाणार असल्याचं सांगितलं. तसेच या योजनेच्या लाभ घेण्यासाठी महिलांच्या नावाची नोंदणीही सुरु करण्यात आली. मात्र, आता सरकारच्या याच घोषणेवर दिल्लीच्या महिला व बाल कल्याण मंत्रालयानं आक्षेप घेतला आहे. दरम्यान, या पार्श्वभूमीवरून आता दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत यावर भाष्य केलं. तसेच सरकारने सुरु केलेल्या या योजना नाकारत यासंदर्भात सार्वजनिक नोटीस जारी करणाऱ्या दोन अधिकाऱ्यांवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असा इशारा मुख्यमंत्री आतिशी यांनी दिला आहे. यासंदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसनं दिलं आहे. मुख्यमंत्री आतिशी यांनी म्हटलं की, “सत्ताधारी आम आदमी पक्षाने (आप) जाहीर केलेल्या दोन योजनांसाठी नोंदणी प्रक्रिया नाकारत आणि सार्वजनिक नोटीस जारी करणाऱ्या दोन अधिकाऱ्यांवर कठोर प्रशासकीय कारवाई केली जाईल.

### पोलिसांची चौकशी केली जाईल

संबंधित अधिकारी महिला आणि बाल विकास विभागाचे सहसंचालक आणि आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाचे विशेष सचिव आहेत.”योजनेला मंत्रिमंडळाच्या मंजुरीच्या अधिसूचनेची प्रत दाखवत अतिशी म्हणाल्या, “महिला सन्मान योजनेंतर्गत महिलांना १ हजार रुपये भत्ता देण्यात येण्यासंदर्भात मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या निर्णयाची ही अधिसूचना आहे. त्यामुळे अशा खोट्या सार्वजनिक नोटीस बजावल्याबद्दल या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई आणि दिल्ली पोलिसांची चौकशी केली जाईल.

# मी पुरस्कार सोहळ्यांना जात नाही : आमिर खान

आमिर खानला मिस्टर परफेक्शनिस्ट असं म्हटलं जातं. तसंच नाना पाटेकर यांची ओळख एक हरहुन्नरी आणि वास्तववादी कलाकार म्हणून आहे. लवकरच हे दोघं एक चित्रपट करणार आहेत. म्हणजे त्यांनी तसं जाहीर तरी केलं आहे. आता तो कुठला चित्रपट असेल? त्याचं नाव काय या सगळ्या चर्चा अजून सुरु व्हायच्या आहेत. मात्र नाना पाटेकर आणि आमिर खान यांच्या गप्पांच्या सत्रात आमिर खान पुरस्कार सोहळ्यांना का जात नाही त्याचं कारण समोर आलं आहे.आमिर खान आणि नाना पाटेकर या दोघांच्या गप्पांची मैफल झी म्युझिकच्या CANDID CONVERSATION या शोमध्ये रंगली होती. या मुलाखतीत नाना पाटेकर यांनी त्यांचा चित्रपटांचा प्रवास उलगडला. नाना पाटेकर म्हणाले, “मी नाटकांतून कामं करायचो. त्यावेळी स्मिता पाटीलने मला सिनेमांत आणलं. मला स्मिताने सांगितलं होतं की नाटकांचा प्रेक्षक हा हजारोंच्या संख्येत असतो तर सिनेमा लाखो लोकांपर्यंत पोहचतो. तू सिनेमांत असलं पाहिजेस असं मला स्मिता म्हणाली होती तिच्या आग्रहामुळे मी सिनेमात आलो.”आमिर खान म्हणाला की मी महाविद्यालयात असताना नाटकांतून काम केलं आहे. मात्र नंतर मला चित्रपट हे माध्यम जास्त जवळचं वाटलं. त्यामुळे मी त्यातून भूमिका करु लागलो. मी काहीसा बेशिस्त आहे. जर माझ्याकडे काही काम नसेल तर मी बेशिस्तपणे वागतो, पण चित्रपट करायचा असेल तर मी सगळ्या वेळा पाळतो. आता मी दर वर्षाला एक चित्रपट करायचा असं ठरवलं आहे. तसंच इतक्या दिवसांमध्ये आई, पत्नी, मुलं यांना जो वेळ दिला नाही तो आता मी द्यायचं ठरवलं आहे. यानंतर गप्पा आल्या त्या पुरस्कारांवर याबाबत दोन्ही कलावंतांनी भाष्य केलं आहे. आमिर खान पुरस्कार सोहळ्यांना जात नाही याची कायमच चर्चा होते त्याचं कारण काय हे आता आमिर खाननेच उलगडलं आहे.मी सुरुवातीला पुरस्कार सोहळ्यांना जायचो. पण मी नंतर जाणं बंद केलं असं आमिर खान म्हणाला. त्यावर नाना पाटेकरांनी विचारलं की तू पुरस्कार सोहळ्यांना का जात नाहीस? त्यावर आमिर म्हणाला, “आपण एका सर्जनशील क्षेत्रात काम करतो.

## विवेकचा 17 वर्षांनी खुलासा

विवेक ओबेरॉय सध्या त्याच्या व्यवसायामुळे सर्वत्र चर्चेत आहे. बॉलीवूड सिनेविश्वापासून दूर होऊन त्याने व्यवसाय करण्यास प्राधान्य दिलं आणि आजच्या घडीला तो जगातील यशस्वी व्यावसायिकांपैकी एक म्हणून ओळखला जातो. काही दिवसांपूर्वीच विवेक मुंबई सोडून कायमचा दुबईला शिफ्ट झाला आहे. पण, तरीही तो भारतात येऊन-जाऊन असतो.आपल्या फिल्मी करिअरमध्ये त्याने अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम करण्यास नकार दिला होता पण, हेच सिनेमे पुढे जाऊन बॉक्स ऑफिसवर ब्लॉकबस्टर ठरले होते. यामध्ये ‘हम तुम’, ‘मुन्नाभाई MBBS’, ‘ओम शांती ओम’ अशा अनेक चित्रपटांचा समावेश आहे. याबद्दल विवेकने ‘मेन एक्सपी’ला दिलेल्या मुलाखतीत मनमोकळेपणाने संवाद साधला आहे. तसेच ‘साथिया’मध्ये शाहरुखने केलेल्या कॅमिओबद्दल देखील विवेकने आपलं मत मांडलं आहे.विवेक ओबेरॉयला ( VIVEK OBEROI ) शाहरुख खानच्या ‘ओम शांती ओम’ चित्रपटात खलनायकाची भूमिका ऑफर झाली होती. पण, त्याच दरम्यान प्रदर्शित झालेल्या ‘शूटआउट ॲट लोखंडवाला’ चित्रपटात विवेकने गँगस्टरची भूमिका साकारली होती. याबद्दल अभिनेता जवळपास १७ वर्षांनी व्यक्त झाला आहे.

## आधी शुभेच्छा, मग फ्लाइंग किस



२५ डिसेंबर २०२४ म्हणजेच, आजपासून बरोबर एक वर्षापूर्वी रणबीर कपूर आणि आलिया भट्ट या सेलिब्रिटी जोडप्याने आपल्या लाडक्या लेकीचा चेहरा माध्यमांसमोर रिव्हिल केला होता. त्या दिवसापासून इंटरनेटवर सर्वत्र राहाचे फोटो, व्हिडीओ व्हायरल होऊ लागले होते. गेल्यावर्षी ख्रिसमसनंतर, यंदा थेट मार्चमध्ये जामनगरला अंबानींच्या प्री-वेडिंग सोहळ्यात नेटकऱ्यांनी राहाची झलक पाहायला मिळाली होती. या वर्षभरात राहा सर्वांची फेव्हरेट स्टारकिड म्हणून ओळखली जाऊ लागली आहे.गेल्यावर्षी ख्रिसमसच्या दिवशी राहाच्या आई-बाबांनी तिची ओळख संपूर्ण जगाला करून दिली होती. आज बरोबर एक वर्षांनी या चिमुकल्या राहाने ख्रिसमसच्या दिवशी माध्यमांसमोर येऊन उपस्थित सगळ्या पापाराझींना चक्क ख्रिसमसच्या शुभेच्छा दिल्या आहेत. इतकंच नाही तर, लाडक्या बाबाच्या कडेवर परत जात असताना... तिला सर्वांनी ‘हाय राहा...हाय राहा’ असा आवाज दिला. हा आवाज ऐकताच, आलियाच्या लेकीने सर्वांना प्रेमळ अंदाजात ‘हाय’ करून गोड अशी फ्लाइंग किस देखील दिली.राहाचे हे गोड व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर सर्वत्र तुफान व्हायरल होत आहेत. तिचा हा क्युट अंदाज पाहून सगळे जण भारावून गेले आहेत.सुरुवातीला राहाची ( RAHA KAPOOR ) आई अभिनेत्री आलिया भट्ट पापाराझींसमोर आली. तिने सर्वांना, “शांत बसा...नाहीतर राहा घाबरेल” अशी विनंती केली. यानंतर लाडक्या लेकीला कडेवर घेऊन रणबीर माध्यमांसमोर आला. राहाची एन्ट्री होताच ती पटकन ‘हाय मेरी ख्रिसमस’ असं म्हणाली. लेकीचे बोबडे बोल ऐकून आलिया-रणबीर देखील भारावून गेले होते. यानंतर सर्वांना अभिवादन करून कपूर कुटुंबीय पार्टीला निघाले. तेव्हा सगळेजण राहाला आवाज देऊ लागले. यादरम्यान, गोंडस राहाने सर्वांना ‘हाय’ करत फ्लाइंग किस दिल्याचं पाहायला मिळालं.नेटकऱ्यांनी या व्हिडीओवर कौतुकाचा वर्षाव केला आहे. राहाचे ( RAHA KAPOOR ) बोबडे बोल ऐकून सर्वजण भारावून गेल्याचं कमेंट्स वाचून स्पष्ट होत आहे. दरम्यान, राहाचा जन्म ६ नोव्हेंबर २०२२ मध्ये झाला. यानंतर वर्षभराने आलिया-रणबीर लेकीचा चेहरा सर्वांसमोर रिव्हिल केला होता. तर, यंदा या दोन वर्षांच्या चिमुकलीने सर्वांना शुभेच्छा दिल्याचं पाहायला मिळत आहे.

## जान्हवी कपूर आहे उत्कृष्ट चित्रकार

जेव्हा भावना व्यक्त करण्यासाठी शब्द अपुरे पडतात, तेव्हा चित्रकला एक सुंदर माध्यम म्हणून कार्य करते. अलीकडेच जान्हवी कपूरने सोशल मीडियावर तिच्या मोकळ्या वेळेत बनवलेल्या काही कलाकृतींची झलक शेअर केली. जान्हवी कपूर सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असते. इन्स्टाग्रामवर ती तिच्या आयुष्यातील अनेक गोष्टींचे अपडेट्स शेअर करते. जान्हवीने तिने स्वतः काढलेल्या चित्रांचा एक फोटो शेअर केला होता. या चित्राचा फोटो शेअर करताना तिने त्याला एक कॅप्शन दिले होते. तिने तिच्या इन्स्टाग्राम पोस्टमध्ये म्हटले , “पप्पा जेव्हा मला माझ्या चित्रांबरोबर विद्यार्थ्यांसारखी पोझ देण्यास सांगतात, जेणेकरून ते त्यांच्या मित्रांच्या ग्रुपला ते फॉरवर्ड करून माझ्या खूपच बेसिक आर्ट स्किल्सची स्तुती करू शकतील.” जान्हवी सारखेच तुम्हीही चित्रकलेचा छंद जोपासू शकता. यासाठी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले आहे.नवीन छंद सुरू करताना भीती वाटू शकते. जर तुम्हालाही जान्हवीसारखे तुमचे कलात्मक कौशल्य बेसिक वाटत असेल, ते सुधारण्यासाठी काही सोप्या टिप्स वापरता येतील.काव रंज, ‘क्रिएटइट’चे डायरेक्टर, म्हणाले, “चित्रकलेसाठी महागडे किंवा विशिष्ट रंग वा ब्रश घेण्याची गरज नाही. एखादे आर्ट स्टेशन तयार करा. समर्पित जागा तुमच्या सवयीला नियमित ठेवेल. कधी कधी कागद आणि पेन्सिलचा किंवा रंगांच्या काही चिठ्ठ्यांचा वापर करा.”स्वतः चित्रकला शिकलेल्या हिमांशी बाथला यांनी सांगितले, “जर तुम्हाला दिवसभरात फारसा वेळ मिळत नसेल, तरीही दहा मिनिटे चित्रकलेसाठी द्या. पेंटिंग परिपूर्णतेबद्दल नसून ती अभिव्यक्तीबद्दल आहे.

## ही सवय सोडण्यासाठी बिग बॉसमध्ये घेतला होता सहभाग





शक्ती कपूर अनेक वर्षांपासून विनोदी व खलनायकाच्या भूमिका करीत प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहेत. त्यांनी अनेकदा पडद्यावर खलनायक साकारला असला तरी खऱ्या आयुष्यात ते विनोदी आणि प्रेमळ स्वभावाचे आहेत. त्यांच्या या स्वभावाची आणि लाडकी लेक श्रद्धा हिची त्यांच्याशी असलेल्या बॉण्डिंगची नेहमी चर्चा होते. श्रद्धा कपूरने एकदा शक्ती कपूर यांना एक सल्ला दिला होता. तो सल्ला मनावर घेत, त्यांनी आपल्या लेकीला एक गोष्ट सिद्ध करून दाखविण्यासाठी ते एक महिना बिग बॉसमध्ये सहभागी झाले होते.शक्ती कपूर २०११ मध्ये बिग बॉस या रिॲलिटी शोमध्ये सहभागी झाले होते. ‘बिग बॉस सीझन ५’ मध्ये ते स्पर्धक होते आणि शोच्या प्रीमियरच्या वेळी त्यांनी सांगितले की, श्रद्धानेच त्यांना या शोचा भाग होण्यासाठी प्रोत्साहन दिले.शक्ती कपूर यांना श्रद्धा कपूरने एकदा दारू सोडण्याचा सल्ला दिला होता. याच कारणामुळे ते या शोमध्ये सहभागी झाले होते. शक्ती कपूर बिग बॉसच्या घरातून बाहेर पडणारे पाचवे स्पर्धक ठरले. ते घरात २८ दिवस होते. शोमधून बाहेर पडल्यानंतर शक्ती यांनी सांगितले होते की, श्रद्धाला त्यांचा अभिमान आहे. कारण- त्यांनी शोदरम्यान एक महिना दारूला हात लावला नाही.

# विनोद कांबळीला लाखांची मदत जाहीर !

## विनोद कांबळीवर काल्हेर येथील आकृती रुग्णालयात उपचार सुरू

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**टीम इंडियाचा माजी क्रिकेटपटू विनोद कांबळी भिवंडीतील काल्हेर या ठिकाणी असलेल्या आकृती रुग्णालयात प्रकृती बिघडल्याने दाखल झाला आहे. क्रिकेटपटू विनोद कांबळीला एकनाथ शिंदेंनी मदत जाहीर केली आहे. तसंच श्रीकांत शिंदे हे लवकरच विनोद कांबळीची भेट घेणार आहेत.**





भारतीय क्रिकेट संघाचा आक्रमक माजी फलंदाज विनोद कांबळी यांना प्रकृतीच्या कारणास्तव ठाणे येथील आकृती हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या आदेशानुसार त्यांचे ओएसडी मंगेश चिवटे यांनी भेट घेऊन विनोद कांबळीची चौकशी केली. तसंच आकृती रुग्णलायच्या डॉक्टरांशीचर्चा करून विनोद कांबळी यांच्या उपचारात कोणतीही कमतरता राहणार नाही याची काळजी घ्या अशी विनंती केली.क्रिकेटपटू विनोद कांबळी यांची सध्याची परिस्थिती पाहता कल्याण लोकसभा मतदार संघाचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी कांबळी यांस वैयक्तिक ५ लाख रुपयांची मदत करण्याचे जाहीर केलं आहे. डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या माध्यमातून ही मदत पुढील आठवड्यात करण्यात येणार असून येणाऱ्या काळात त्यांना अजून मदत करण्याचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी आश्वासन दिल्याचे ओएसडी मंगेश चिवटे यांनी सांगितले. राज्याचे संवेदनशील माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या मदतीबद्दल क्रिकेटपटू विनोद कांबळीने कृतज्ञता व्यक्त केली तसेच हॉस्पिटलमध्ये भेटण्याची विनंती केली. लवकरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ श्रीकांत शिंदे हे क्रिकेटपटू विनोद कांबळी यांची भेट घेऊन कांबळी परिवाराला मदत करणार आहेत.रुग्णालयातील वरिष्ठ डॉक्टर विवेक त्रिवेदी यांनी सांगितले की, तपासणीदरम्यान कांबळींच्या मेंदूमध्ये रक्ताच्या गाठी दिसल्या. आता मंगळवारी त्याच्या आणखी काही चाचण्या घेण्यात येणार आहेत. आयुष्यभर मोफत उपचार देण्याचे आश्वासन दिले आहे. विनोद कांबळी यांची प्रकृती आता ठीक असल्याचं समोर आलं. तसेच विनोद कांबळींच्या मूत्राशयाला संसर्ग झाला असून त्यांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होत आहे, अशी माहिती आकृती रुग्णालयाचे डॉ. शैलेश सिंह ठाकूर यांनी दिली.विनोद कांबळीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. यामध्ये तो सचिन तेंडुलकरशी बोलताना दिसला. रमाकांत आचरेकर सरांच्या स्मारकाच्या उद्घाटन प्रसंगी सचिन आणि विनोद कांबळी एकत्र आले होते. दोघेही एकाच मंचावर होते. मात्र ज्या मैदानावर विनोदची बॅट तळपायची त्या ठिकाणी त्याला व्हिल चेअरवर आलेलं पाहून अनेकांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या होत्या.विनोदचा हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर अनेक माजी भारतीय खेळाडू त्याच्या मदतीसाठी पुढे आले होते आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनीही विनोद कांबळीला पाच लाखांची मदत जाहीर केली आहे.

### कांबळींच्या मेंदूमध्ये रक्ताच्या गाठी

राज्याचे संवेदनशील माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या मदतीबद्दल क्रिकेटपटू विनोद कांबळीने कृतज्ञता व्यक्त केली तसेच हॉस्पिटलमध्ये भेटण्याची विनंती केली. लवकरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ श्रीकांत शिंदे हे क्रिकेटपटू विनोद कांबळी यांची भेट घेऊन कांबळी परिवाराला मदत करणार आहेत.रुग्णालयातील वरिष्ठ डॉक्टर विवेक त्रिवेदी यांनी सांगितले की, तपासणीदरम्यान कांबळींच्या मेंदूमध्ये रक्ताच्या गाठी दिसल्या. आता मंगळवारी त्याच्या आणखी काही चाचण्या घेण्यात येणार आहेत. डॉ. त्रिवेदी यांनी असेही उघड केले की रुग्णालयाचे प्रभारी डॉ. एस सिंग यांनी कांबळीला आयुष्यभर मोफत उपचार देण्याचे आश्वासन दिले आहे. विनोद कांबळी यांची प्रकृती आता ठीक असल्याचं समोर आलं. तसेच विनोद कांबळींच्या मूत्राशयाला संसर्ग झाला असून त्यांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होत आहे, अशी माहिती आकृती रुग्णालयाचे डॉ. शैलेश सिंह ठाकूर यांनी दिली.

भारतीय क्रिकेट संघाचा आक्रमक माजी फलंदाज विनोद कांबळी यांना प्रकृतीच्या कारणास्तव येथील आकृती हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या आदेशानुसार त्यांचे ओएसडी मंगेश चिवटे यांनी भेट घेऊन विनोद कांबळीची चौकशी केली. तसंच आकृती रुग्णलायच्या डॉक्टरांशीचर्चा करून विनोद कांबळी यांच्या उपचारात कोणतीही कमतरता राहणार नाही याची काळजी घ्या अशी विनंती केली.क्रिकेटपटू विनोद कांबळी यांची सध्याची परिस्थिती पाहता कल्याण लोकसभा मतदार संघाचे श्रीकांत शिंदे यांनी कांबळी यांस वैयक्तिक ५ लाख रुपयांची मदत करण्याचे जाहीर केलं आहे. डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या माध्यमातून ही मदत पुढील आठवड्यात करण्यात येणार असून येणाऱ्या काळात त्यांना अजून मदत करण्याचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी आश्वासन दिल्याचे ओएसडी मंगेश चिवटे यांनी सांगितले.

---

# सामन्याच्या परिस्थितीनुसार खेळणे आवश्यक!

## सुरुवातीला संयम राखण्याचा गावस्करांचा पंतला सल्ला

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघाचे माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी फलंदाजीला आल्यावर आधी सामन्याच्या परिस्थितीचा आणि पहिल्या अर्ध्या तासाचा आदर कर, असा यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंतला सल्ला दिला आहे. गेल्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात भारतीय संघाने कसोटी मालिका जिंकली होती आणि यात पंतची भूमिका महत्त्वाची ठरली होती.**



मात्र, या वेळेस पंतला फारसा प्रभाव पाडता आलेला नाही. आतापर्यंतच्या पाच डावांत ३७, १, २१, २८, ९ अशाच धावा पंतला करता आल्या आहेत. आक्रमक पवित्रा ही पंतच्या फलंदाजीची ओळख आहे. दुसऱ्या कसोटीत फलंदाजीला आल्यावर त्याने वेगवान गोलंदाज स्कॉट बोलँडला पहिल्याच चेंडूवर पुढे येऊन टोलवले होते. मात्र, पंतने डावाच्या सुरुवातीला संयम राखणे आवश्यक आहे, असे गावस्करांना वाटते. ''अन्य फलंदाजांप्रमाणेच पंतने फलंदाजीला आल्यावर किमान सुरुवातीचा अर्धा तास परिस्थितीचा अंदाज घेणे आणि त्याचा आदर करणे आवश्यक

### पंतची भूमिका महत्त्वाची ठरली

पॅट कमिन्स आणि जोश हेझलवूड यांनी पंतला विशेष अडचणीत टाकले आहे. बोलँड यष्टींच्या उजव्या बाजूने (राऊंड द विकेट) गोलंदाजी करत असल्यामुळे त्याच्याविरुद्ध धावा करणे अवघड जाते,'' असेही गावस्कर यांनी म्हटले आहे.भारतीय संघाचे माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी फलंदाजीला आल्यावर आधी सामन्याच्या परिस्थितीचा आणि पहिल्या अर्ध्या तासाचा आदर कर, असा यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंतला सल्ला दिला आहे. गेल्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात भारतीय संघाने कसोटी मालिका जिंकली होती आणि यात पंतची भूमिका महत्त्वाची ठरली होती.

आहे. भारताची ३ बाद ५२५ अशी धावसंख्या असताना तो फलंदाजीला आणि त्याने पहिल्या चेंडूपासून आक्रमक खेळ केला तर मी समजू शकतो. मात्र, पन्नाशीतच निम्मा संघ गारद झालेला असताना पंतने पहिल्या चेंडूपासून फटकेबाजी करणे योग्य नाही,'' असे गावस्कर म्हणाले. ''ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांनी या मालिकेत भारतीय फलंदाजांसमोर कडवे आव्हान उभे केले आहे. ते चेंडू विशिष्ट कोनातून टाकत आहे.